Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

JAGDAMBA EDUCATION SOCIETY'S
**SANTOSH N. DARADE POLYTECHNIC**
At.Babhulgaon, Tel. Yeola - 423 401
CENTRAL LIBRARY

Please consider the environment before printing…

दिनांक:- 23 / 01 / 2024

# Birth Anniversary of Sant Gadge Baba

## संत गाडगेबाबा

Jagdamba Education Society's



## प्रस्तावना:

संत गाडगेबाबा यांचे मूळ घरचे नाव डेबू होते. परंतु सर्वजण त्यांना 'गाडगेबाबा' (Gadge Baba) म्हणत असत. संत गाडगे बाबा यांचे संपूर्ण नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर असे होते. गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्हातील शेंडगाव येथे झाला होता. ते जातीने परीट होते. 23 फेब्रुवारी ला संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी केली जाते. त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी आणि आईचे नाव सखूबाई होते. कोणतेही काम मनापासून करण्याची गाडगे बाबांना सवय होती. काम करायचे ते अगदी नीटनेटके. आपला हात ज्याला लागेल ते सुंदर दिसले पाहिजे, अशी त्याची काम करण्याची पद्धत होती. लहान पणापासूनच त्यांनी काबाड कष्ट करणाऱ्या लोकांचे दुःख, दारिद्य पाहून त्यांचा जीव तुटत होता. ते ज्या समाजात वावरत होते. त्या समाजातील लोकांचे वागणे त्यांना आवडत नव्हते. त्या लोकांच्या व्यसनाधीनता मुळे ते कर्जबाजारी होत होते. रोगराई झाली, तर औषध न घेता देवाला नवस करत होते. कोंबडे-बकरे यांचे बळी देत होते. गाडगे बाबांना हे आवडत नव्हते. लोकांनी चांगले वागावे म्हणून ते त्यांना जीव तोडून सांगत असायचे. गाडगे महाराजांनी लहान वयातच मनाशी ठरवले, की 'मी इतके कष्ट करीन, की मी न बोलताही लोक माझे ऐकतील. त्यांच्यात सुधारणा होईल.'

संत गाडगे महाराजांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी शेंडगाव येथे झाला. अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा इ. समाजातील असणाऱ्या दोषांवर कोरडे ओढून ते दोष दूर करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. संत गाडगेबाबा खऱ्या अर्थाने महान  समाजसुधारक होते. बहुजन समाजातील भोळ्याभाबड्या जनतेला शहाणे करून त्यांना योग्य मार्ग दाखविण्याचा ध्यास त्यांनी घेतला होता. त्यांच्या अशा महान कार्यानिमित्त शासनाने Sant Gadge Baba Gram Swachata Abhiyan गावागावांत संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविले, स्वच्छतेचे प्रसारक म्हणून देखील संत गाडगेबाबा प्रसिद्ध आहे. अशा या महान समाजसुधारक संत गाडगे बाबा जयंती २३ फेब्रुवारी रोजी साजरी करण्यात येते.

## पारमार्थिक मार्गाचा अवलंब:

amba Education Society's

संत गाडगेबाबा यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास पारमार्थिक मार्गाचा स्वीकार केल्यावर त्यांनी अतिशय साधेपणाने जीवन जगावयास प्रारंभ केला. त्यांचा वेष म्हणजे अंगावर एक फाटकीतुटकी गोधडी आणि हाती एक फुटके मातीचे गाडगे असा होता. त्यामुळे लोक त्यांना 'गोधडे बुवा' किंवा 'गाडगे बाबा' Gadge Baba या नावाने ओळखू लागले. पुढे त्याच नावाने ते महाराष्ट्रीय लोकांना परिचित झाले. संत गाडगे महाराज प्रापंचिक जीवनातून विरक्त होऊन पारमार्थिक मार्गाकडे वळलेले संतपुरुष होते. परंतु, सर्वसामान्य समाजाकडे मात्र त्यांनी पाठ फिरविली नव्हती. स्वतःच्या संसारापेक्षा सर्व समाजाच्या संसाराची काळजी वाहणारे ते खरेखुरे संत होते.

गाडगेबाबांच्या डोक्यावर शुभ्र चांदीच्या रंगाचे केस , पिंगट डोळे, गोरा रंग, अंगात फाटका पण स्वच्छ शर्ट असायचा. बाबांची शरीरयष्टी जाडजूड , धिप्पाड देह होता. नेसायला एक लुंगी. एका पायात कापडाचा बूट, तर दुसरा पाय अनवाणी असायचा. हातात एक काठी अन एक गाडगे, हात सदा नमस्कारासाठी जोडलेले; त्यांच्याजवळ नेहमी गाडगे असायचे म्हणून त्यांना लोक 'गाडगे महाराज' म्हणत असत.

## संत गाडगेबाबा यांचे कार्य:

स्वच्छता, प्रामाणिकपणा आणि भूतदया यांवर गाडगे महाराजांचा विशेष भर असे. ते ज्या गावी कीर्तनासाठी जात तेथील सर्व परिसर स्वतः हातात झाडू घेऊन प्रथम स्वच्छ करीत असत. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा बाबत असणारे दोष दूर करण्यासाठी भजन, कीर्तन करून समाज प्रबोधन केले. गावोगावी फिरून  सर्व गाव झाडून स्वच्छ केले. महाराष्ट्रामध्ये  पंढरपूर , नाशिक, देहू, आळंदी या तीर्थक्षेत्र  ठिकाणी बाबांनी स्वतः राबून, कष्ट करून, मदत मागून धर्मशाळा बांधल्या. काही नदयांवर घाट बांधले, पाणपोया उघडल्या. गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी सदावर्ते सुरू केली. मुलांसाठी शाळा, महाविदयालये, वसतिगृहे उभी केली. दुःख दिसले की बाबा तिथे धावत. दुष्काळ पडला, लोक अन्नान्न झाले, की बाबा तिथे हजर! स्वतः राबायचे, लोकांनाही सेवेची प्रेरणा दयायचे. त्यांतून अन्न, वस्त्र आणि अशाच गरजेच्या वस्तू निर्माण व्हायच्या. उजाड गावे उभी व्हायची. त्यांनी जात मानली नाही. त्यांचा देव म्हणजे अनाथ, अपंग, दरिद्री व दुःखी लोक. रंजल्या-गांजलेल्यांची सेवा हीच बाबांची देवपूजा !

## संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश:

1. भुकेलेल्यांना अन्न द्या. तहानलेल्यांना पाणी द्या.
2. उघड्यानागड्यांना वस्त्र द्या. बेघरांना आसरा द्या.
3. अंध, पंगू रोगी यांना औषधोपचार करण्यासाठी मदत करा.
4. बेकारांना रोजगार मिळवून देण्यासाठी मदत करा.
5. पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय द्या. गरीब तरुण-तरुणींचे लग्न लावून द्या.
6. दु:खी व निराशांना हिंमत द्या.
7. गोरगरिबांना शिक्षण द्या.
8. शिक्षण घेण्यासाठी मदत करा.

Jagdamba Education Society's
POLYTEC

## संत गाडगेबाबा यांचे विचार:

- दगडात देव नाही तर,देव माणसात आहे.
- विद्या शिका आणि गरिबाले, विद्ये साठी मदत करा.
- शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे.
- माणसाने माणसाबरोबर माणसासारखे वागावे, हाच बोध मी ग्रहण केला आहे.
- शिक्षणाने माणसाचे जीवन फुलते ,आपण ह्या जगात कशासाठी आलोत हे कळते.
- धर्माच्या नावाखाली कोंबड्या बकऱ्या सारखे मुके  प्राणी बळी देवू नका.
- दान घेण्यासाठी हात पसरू नका, दान देण्यासाठी हात पसरा.
- दु:खाचे डोंगर चढल्याशिवाय, सुखाचे किरण दिसत नाही.
- दगड धोंड्यांची पूजा करण्यात वेळ आणि शक्ती वाया घालवू नका.
- माणसाचे खरोखर देव कोण असतील तर ते आई बाप.
- अनाथ, अपंग, दरिद्री व दु:खी लोक. रंजल्या-गांजलेल्यांची सेवा हीच देवपूजा !
- अडाणी राहू नका, मुला-बाळांना शिकावा.
- जो वेळेवर जय मिळवतो, तो जगावरही जय मिळवतो..

गाडगे महाराजांचा उपदेशही अतिशय साधा व सोपा असे. चोरी करू नका, कर्ज काढून सावकाराच्या पाशात आपली मान अडकवू नका, व्यसनांच्या अधीन होऊ नका, देव व धर्म यांच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका या गोष्टी आपल्या कीर्तनातून ते श्रोत्यांना सांगत असत. त्याचबरोबर माणसांनी एकमेकांशी प्रेमाने व बंधुभावाने व्यवहार करावा, अडल्या नडलेल्यांची, रंजल्या-गांजलेल्यांची सेवा करावी, भूतदया म्हणजेच परमेश्वराची पूजा होय असा उपदेशही ते लोकांना करीत असत. माणसाला संसारात राहूनही देवभक्ती करता येते, असे त्यांचे सांगणे असे. नैतिक मूल्यांची जपणूक, मानवता आणि परोपकार यांचे धडे त्यांनी आपल्या कीर्तनातून दिले.

नीलेश जलमकर दिग्दर्शित डेबू तसेच राजदत्त-दिग्दर्शक देवकीनंदन गोपाळा हे चित्रपट गाडगे महाराजांच्या जीवनावर आधरित आहे. स्वच्छतेचे प्रसारक संत गाडगे महाराजांच्या नावाने महाराष्ट्रामध्ये ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत  स्वच्छ गावांच्या ग्रामपंचायतींना गाडगेबाबा ग्रामस्वच्छता पुरस्कार दिला

जात असे. विठल वाघ यांनी डेबु ही कादंबरी  लिहिली. संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर प्रबोधनकार ठाकरे यांनी मानवतावादी युगपुरुष संत गाडगेबाबा ही कादंबरी लिहिली.

**LIBRARIAN**
**MR.U.D. MULANI**
**SND POLYTECHNIC**
**YEOLA-423401**

Jagdamba Education Society's

**PRINCIPAL**
**PROF.U.B JADHAV**
**SND POLYTECHNIC**
**YEOLA-423401**